

मधुवार्ता

# भारतातील पहिली मान्यताप्राप्त मध तपासणी प्रयोगशाळा

दुधासाठी लोकप्रिय असलेल्या भारतातील आणंद (अमूल) या गुजरातमधील शहरामध्ये, राष्ट्रीय स्तरावरील पहिल्या मान्यताप्राप्त मध तपासणी प्रयोगशाळेचा शुभारंभ **केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री श्री. नरेंद्रसिंग तोमर** यांच्या हस्ते, २४ जुलै २०२० रोजी झाला. नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड (एन.डी.डी.बी.) यांच्या आणंद येथील मुख्य कार्यालयाच्या आवारातील 'सेंटर फॉर ॲनालिसिस इन लाईव्हस्टॉक ॲण्ड फूड' (CALF) या मल्टीडिसिप्लिनरी लॅबोरेटरीमध्ये या मध तपासणी प्रयोगशाळेची स्थापना झाली आहे. आज अनेकदा मधाची देशामध्ये तसेच परदेशात विक्री करत असताना मधाच्या गुणवत्तेबाबत शंका घेतली जाते. त्यामुळे विक्री करत असताना, विशेषत: मधाची निर्यात करत असताना अनेक प्रश्न निर्माण होतात. याचाच विचार करून या प्रयोगशाळेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे देशपातळीवर तसेच जागतिक पातळीवर आवश्यक असलेले मध तपासणी प्रमाणपत्र देण्याची सोय करण्यात आली आहे. 'FSSAI' च्या नवीन मध तपासणी नियमांचा विचार करून या लॅबमध्ये मधाची तपासणी आणि प्रमाणपत्र देण्यात येते. तसेच BTS, AGMARK, Codoex, Standard यासारख्या संस्थात्मक नियमांनुसारही तपासणी करून प्रमाणपत्र देण्यात येते. विशेषत्वाने मधामधील एक्स्पोर्ट इन्स्पेक्शन कौन्सिलच्या नियमांनुसार कीटकनाशकांचा अंश, ॲन्टिबायोटिक्स, हेवी मेटल आणि इतर रसायनांचा अंश यांची तपासणी करण्याची सोयही या लॅबमध्ये आहे. या लॅबमध्ये मधमाशी पालकांना प्रशिक्षण देण्याची सोयही केलेली आहे. देशामध्ये मधमाशी पालनाला प्रोत्साहन मिळत असल्याने देशात तसेच परदेशात मधाची विक्री वाढणार आहे. त्यामुळेच गुणवत्ता असलेल्या मधाचे उत्पादन करून त्याचे प्रमाणीकरण करण्यासाठी अशा मान्यताप्राप्त प्रयोगशाळेची स्थापना उपयुक्त ठरणार आहे. **(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**



